# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

(सामान्य प्रशासन विभाग- कर्मचारी भरती/पदोन्नती कक्ष)

## मानधन तत्वावर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर नियुक्तीबाबत.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या महापालिका पाणीपुरवठा, नगररचना व बांधकाम (इमारत व रस्ते) विभागाकडे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) **मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीकरिता नियुक्ती करण्याचे आहे.** तरी या पदासाठी इच्छुक उमेदवारांकडुन दिनांक ८ / ७ /२०२५ रोजी पर्यत कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदांचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | मानधन (दरमहा) |
|---|---|---|---|
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) - | ०५ | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य (civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) सदर पदाच्या कामाचा २ वर्षे कालावधीचा अनुभव आवश्यक.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | रु. २३१००/- |

**उमेदवारांना सर्वसाधारण सुचना व अटी :-**

- उमेदवाराने अर्जासोबत स्वत:चे अलिकडच्या काळातील फोटोसह अर्ज शैक्षणिक अर्हता, अनुभव, आधार कार्ड ओळखपत्र, जन्म तारखेचा दाखला इत्यादी कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह अर्ज **मा. सहाय्यक आयुक्त, सा.प्र.वि.-कर्मचारी भरती/पदोन्नती कक्ष. सांगली, मिरज आणि कुपवाड** महानगरपालिका **यांचे नावे आपटा पोलीस चौकी जवळ, चौकोनी पाण्याची टाकी,पहिला मजला सांगली,**येथे दिनांक ८ /७ /२०२५ रोजीपर्यंत सादर करण्याचा आहे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.
- प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची मुलाखतीनंतर अंतिम निवड करण्यात येईल. याबाबतच्या तारखा अलहिदा कळविण्यात येतील. उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा सद्याचा राहण्याचा पत्ता व मोबाईल नंबर न चुकता नमुद करावा.
- निवड झालेल्या उमेदवारांना ६ महिने कालावधीकरीता नेमणूक देण्यात येणार आहे.
- सदर करार पध्दतीने नियुक्ती हि निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील मानधन तत्वावर असून या नियुक्तीचा महानगरपालिका आस्थापनेवरील सेवेशी कोणताही संबंध नाही.
- नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महानगरपालिकेच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही, अथवा कायदेशीर दाद मागता येणार नाही.
- निवड होणा-या उमेदवारांना महानगरपालिकेच्या शर्ती अटी नुसार विहीत नमुन्यात स्टॅम्प पेपरवर बंधपत्र करुन देणे बंधनकारक राहील.
- सदर जाहिरातीच्या नियुक्त्या, पदसंख्या, शर्ती अटी यामध्ये बदल कमी, अधिक मजकुर इ. बदल वा प्रक्रीया रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

मा. आयुक्त तथा प्रशासकसो यांचे मान्यतेने

(विनायक शिंदे)
**सहाय्यक आयुक्त, सा.प्र.वि.-भरती/पदोन्नती कक्ष**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

क्र.मनपा /साप्रविमआकक्ष/ ७७१ /२०२५
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.
दिनांक -२६ /०६/२०२५.